Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277-5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

## GST (Goods and Services Tax)
EXPLAINED

Valume-VI, Issue-IV
Marathi Part - I
October - December - 2017

IMPACT FACTOR / INDEXING
2016 - 4.205
www.sjifactor.com

AJANTA
PRAKASHAN




Scanned with OKEN Scanner

# मराठी अनुक्रमाणिका भाग - १


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका : एक अभ्यास<br>**अलका रानबा जामकर** | १-३ |
| २ | वसाहत कालीन भारतातील महसूल पध्दती<br>**अनिल जामकर** | ४-६ |
| ३ | जीएसटीचे सामाजिक - आर्थिक परिणाम<br>**श्रीमती अंजली दशरथ काळे** | ७-८ |
| ४ | जी. एस. टी. व तिचे परिणाम<br>**डॉ. बी. डी. तोडकर** | ९-१४ |
| ५ | सामान्य नागरिक आणि वस्तु व सेवा कर एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. बालाजी गणपतराव आडे** | १५-१७ |
| ६ | जीएसटी आणि सामान्य लोक<br>**बेंबळगे सरिता महादेव** | १८-२३ |
| ७ | क्रीडा आणि जी. एस. टी.<br>**प्रा. बिराजदार दत्तात्रय महादेव** | २४-२५ |
| ८ | वस्तू व सेवा कर : सर्व सामान्य जनतेवर होणारा परिणाम<br>**प्रा. चंद्रप्रभा निकम** | २६-२९ |
| ९ | विदेशी व्यापार आणि जीएसटी : एक विश्लेषणात्मक अभ्यास<br>**डॉ. डी. डी. भोसले** | ३०-३२ |
| १० | वस्तू आणि सेवा कर आणि शेती क्षेत्र<br>**दत्तात्रय रावसाहेब घोडके**<br>**प्रा. डॉ. शिवाजी यादव** | ३३-३६ |
| ११ | वसाहत कालीन भारतातील महसूल पध्दती<br>**अनिल जामकर** | ३७-३९ |
| १२ | जीएसटीचा कृषी क्षेत्रावरील परिणाम<br>**जनार्दन जानजी देवरे** | ४०-४३ |
| १३ | सामान्य माणूस आणि वस्तू व सेवा कर<br>**प्रा. बी. एस. सावंत** | ४४-५२ |




Scanned with OKEN Scanner

१३

# सामान्य माणूस आणि वस्तू व सेवा कर

**प्रा. बी. एस. सावंत**
वाणिज्य विभाग, शि. म. ज्ञानदेव मो. महाविद्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद.

भारत १ जुलै २०१७ रोजी वस्तू व सेवा कर ( GST) प्रणालीची अंमल बजावणी झाली आहे. जगातील १६० पेक्षा अधिक देशांनी ( GST) चा स्वीकार केला आहे. ( GST) पूर्वी भारतात अनेक अप्रत्यक्ष कर अस्तिवात होते. परंतु 'एक देश, एक बाजारपेठ, एक कर' हे उदिदष्ट ठेवून सरकारने सर्व अप्रत्यक्ष करा ऐवजी एकच अप्रत्यक्ष कर प्रणाली आसावी म्हणून वस्तू व सेवा कर प्रणालीचा म्हणजेच GST चा स्वीकार केला आहे.

भारतात १ जुलै पूर्वी जी कर रचना होती त्यामध्ये केंद्रीय कर राज्य सरकारचे कर तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर असे वेगवेगळया टप्यावर अत्यंत क्लिष्ट, गुंतागुंतीची, करदात्याच्या (ग्राहक) दृष्टिने तापदायक, वेळखाऊ व एक प्रकारे विकास प्रक्रियेला खीळ घालणारी अशी ही कर प्रक्रिया होती या क्लिष्ट कर प्रक्रियेमुळे वस्तू व संवांच्या किंमती वाढून भाववाढ होत होती. तसेच पूर्वीच्या कर प्रणालीमुळे अनेक समस्यांना तोंड छयावे लागत होते. यामधूनच गैरकारभार, करचुकवेगीरी, भ्रष्टाचार. अशा अनेक समस्या निर्माण होत होत्या. या सर्व बाबींमधून सुटका करुन घेण्यासाठी 'एक राष्ट्र एक कर' ही प्रणाली अतिशय परिणाम कारक आणि ग्राहक, उत्पादक व सरकार या सर्वांना न्याय देणारी राहिल याच दृष्टीकोणातून GST ही कर प्रणाली संपूर्ण देशात लागू झाली.

**वस्तु व सेवा कराचा पार्श्वभुमीय :**

* जगातील जवळपास आज १६० देशांनी वस्तू व सेवा कर प्रणालीची अमंलबजावणी केली आहे. जगात सर्व प्रथम फ्रान्स या देशाने GST ची अवलंब केला होता. त्या नंतर हळूहळू इतर देशांनी GST चा अवलंब केला आहे.
* भारतात GST लागू करण्यासाठी प्रथम १७ जुलै २००० मध्ये अटल बिहारी वाजपेयी सरकारकडुन राज्यांच्या अर्थमंत्र्यांची अधिभार समिती स्थापन केली गेली होती.
* डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली २००३ मध्ये नेमण्यात अलिल्या ďTask force ङ ने सर्वप्रथम ही संकल्पना आपल्या अहवालात मांडली होती.
* २००६ मध्ये युपीए सरकारने GST विधेयक तयार केले आणि २०१० मध्ये त्याची अंमलबजावणी करण्याची मुदत ठरवली होती.
* २०११ मध्ये GST लागू करण्यासंबंधीचं विधेयक प्रथम मांडण्यात आले होते. आणि संसदीय स्थायी समितीकडे पाठवले होते. २०१३ मध्ये समितीने आपला अहवाल दिला परंतू लोकसभा निवड नुकीमुळे हे विधेयक मागे पडले.
* २०१४ मध्ये भज्ञजप सरकारला बहुमत मिळाल्यामुळे त्यांनी २०१५ मध्ये GST विधेयक संमत करण्यात आलं. आणि ते राज्यसभेकडे संमतीसाठी पाठविले.
* ३ ऑगस्ट २०१६ रोजी राज्यसभेने ते विधेयक संमत करुन त्यात काही बदल करण्यासाठी लोकसभेकडे पाठवले. लोकसभेने त्यात बदल केल्यानंतर संसदेने पारीत केलेले संविधान (१२२ सुधारणा) विधेयक २०१४ ला महामहीम राष्ट्रपती यांनी ८ सप्टेंबर २०१६ संमती दिली.



Scanned with OKEN Scanner

AJANTA - ISSN - 2277-5730 - IMPACT FACTOR - 4.205 (www.sjifactor.com)

* राष्ट्रपतीने संमती दिल्यानंतर संविधान कायदा २०१६ अस्तित्वात आला आणि या कायदयाच्या आधारे १ जूलै २०१७ मध्ये GST कर प्रणाली भारतात अस्तित्वात आली.

**GST म्हणजे काय**

GST म्हणजे वस्तू व सेवा कर असुन तो वस्तू किंवा सेवांवर हा एकच कर १ जुलै २०१७ पासुन राहिल. GST हा एक अप्रत्यक्षं कराचाच एक प्रकार आहे हा कर वस्तुचे उत्पादन, विक्री, आयात आणि सेवा या सर्वांवरील राष्ट्रीय पातळीवरील सर्व समावेशक अप्रत्यक्ष कर आहे. GST मुळे VAT सह इतर सर्व अप्रत्यक्ष कर रदद झाले आहेत. राज्य आणि केंद्र सरकारच्या वेगवेगळया करप्रणालींना पर्याय म्हणून GST कडे पाहिले जाते. GST ही भारतातील सर्वात मोठी सुधारणा आहे. या कर प्रणालीमुळे करचुकवणा-यांवर चाप बसणार आहे. GST मूळे सेंट्रल संल्स टॅक्स, सेवा कर, एक्साइज टॅक्स, लक्झरी टॅक्स, मनोरंजन कर, VAT इत्यादी सारखे कर रदद झाले आहेत.

GST मध्ये कराचे दर वेगवेगळे आहेत वस्तू व सेवां नुसार कर दर निश्चित केले आहेत ते पुढील प्रमाणे आहेत.

**कर दर रचना**

| प्रकार | कराचा दर | वस्तू व सेवा प्रकार |
|---|---|---|
| शुन्याधारित | ०% | जीवानवश्य वस्तू |
| निम्न दर | ५% | सर्वसाधारण वापरात असणा-या वस्तू व सेवा |
| दोन प्रमाण दर | १२% व १८% | मोठया प्रमाणावरील ग्राहकां उपयोगी वस्तू व सेवा |
| उच्च दर | २८% | लक्झरी मोटार, तंबाखू उत्पादने व शीतपेय |
| अतिरिक्त सेस | - | लक्झरी मोटार, तंबाखू उत्पादने व शीतपेय व इतर |

**GST ची आवश्यकता**

पूर्वीच्या अप्रत्यक्ष कर प्रणालीमध्ये करावर कराची आकारणी केली जात होती. उदा. केंद्र सरकार उत्पादीत वस्तूंवर लावण्यात येणा-या केंद्रित उत्पादन शुल्कावर विक्री कराची आकारणी केली जाते. यालाच करावर कर म्हणजेच कैसकेडींग ऑफ टॅक्स ( Cascading of Tax) असे म्हणतात. अप्रत्यक्ष कर केंद्र व राज्य सरकारव्दारे आकारले जातात. यामध्ये अनेक दोष आहेत हे दोष GST मुळे नष्ट होणार आहेत.

१) मुल्यवर्धीकर (VAT) :- राज्य सरकारव्दारे व उत्पादन शुल्क, सेवा कर, हे केंद्र सरकार व्दारे आकारले जातात. हे कर केंद्र व राज्य सरकारव्दारे स्वतंत्रपणे आकारले जातात. त्यामुळे एका कराची वजावट दुसरा कर भरताना दिली जात नाही.

२) पूर्वी उत्पादीत मालावर केंद्रीय उत्पादन शुल्क लावले जाते व त्यावर मुल्यवर्धित कर आकारला जातो. त्यामुळे करावर कराची आकारणी होवून कराचा बोजा वाढत जात होता. परंतू GST मध्ये करावर कर लावला जाणार नाही त्यामुळे कराचा बोजा कमी होईल.

३) पूर्वी कोणत्याही मालाची विक्री झाली की विक्री कर आणि सेवा प्रदान केली की सेवाकर किंवा उत्पादन करुन विक्री केली तर प्रथम उत्पादन शुल्क व नंतर विक्रीकर असे स्वरुप होते. जी ए टी कायदयात विक्रीला महत्व नसून वस्तू व सेवा कर पुरवठा केल्यास लागणार आहे.

Scanned with OKEN Scanner

४) पूर्वी उत्पादन व विक्री पश्चात विक्रीच्या आधारे विक्रीकर लागत होता आणि तो ज्या राज्यात विक्री झाली असेल त्या राज्यात जमा केला जात होता परंतु GST मध्ये मालाचा किंवा सेवांचा पुरवठा करुन उपभोग ज्या राज्यात घेतला जात असेल त्या राज्यात झाला. GST आकारला जाणार आहे. हा मुलभूत फरक पूर्वीचा अप्रत्यक्ष कर व GST मध्ये आहे.

## GST चे फायदे

जी एस टी ही वस्तू आणि सेवेच्या पुरवठ्यावर कर लावण्याची पध्दत आहे. या पध्दतीमध्ये मालाच्या उत्पादनापासुन शेवटच्या विक्रेत्यापर्यंत होणा-या पुरवठ्यांच्या वाढीव मुल्यावर कर लावण्यात येतो. तसेच सेवा देणा-यावर सेवेच्या किंमतीवर कर आकारला जातो. या प्रक्रियेत कर आकारतांना वस्तू व सेवा प्राप्त करताना भरलेल्या कराची पूर्ण वजावट देण्यात येते. GST चे पुढील फायदे आहेत.

१) या कर प्रणालीमध्ये केंद्र व राज्यसरकारचे बरेच अप्रत्यक्ष कर एकत्र आल्याने कर प्रणाली सोपी व सुटसुटीत होणार आहे.

२) GST मुळे व्यापारी व उत्पादकांना हिशेब ठेवणे सोपे होईल कारण अनेक कर कायदया ऐवजी एकच कर कायदा लागू होईल.

३) पूर्वीच्या कर प्रणालीत जसा करावर कर लागत होता तसा करावर कर लागत नसल्यामुळे वस्तुंच्या किंमती कमी होऊन ग्राहकांचा फायदा होईल.

४) एक देश एक कर ही एकच कर प्रणाली अंगीकृत झाल्याने संपूर्ण देश एकसंघ बाजारपेठ होईल.

५) GST मुळे कर चोरी किंवा कर न भरणे किंवा कमी भरणे होईल.

६) संपूर्ण देशात एकच कर प्रणाली आसल्यामुळे देशात कोठेही वस्तू खरेदी केली तरी किंमत सारखीच राहणार आहे.

७) देशात अनेक कर असल्यास कर वसुली, कर आकारणी, करचुकवणे अशा समस्या निर्माण होतात परंतू GST हा एकच कर असल्यामुळे Tax Structure सोपे आणि कार्यक्षम होईल.

८) GST हा कर वस्तू आणि सेवा या दोन्हीवर आकारला जाईल.

९) पूर्वीच्या कर प्रणालीत वस्तूची खरेदी करतांना ३०% ते ३५% इतका कर दयावा लागत होता परंतू GST मध्ये तो २० ते २५% इतका दयावा लागेल.

१०) देशाच्या GDP मध्ये वाढ होऊन प्रगतीचा वेग वाढेल.

GST ही कर प्रणाली ग्राहक आणि उत्पादक या दोघांच्या दृष्टीने खुपच फायदेशीर आहे कारण उत्पादकांचा वस्तु बाजारपेठे पर्यंतचा पूरवठा करण्याचा वेळ वाचला आहे आणि एकच कर उत्पादकाला दयावा लागत असल्यामुळे प्रत्येक टप्यावर जे कर दयावे लागत होते त्यापासुन त्यांची सुटका झाली आहे. आणि त्यामुळे उत्पादकांना नवनिर्मीतीसाठी वाव निर्माण झाला आहे. आणि ग्राहकांवरील करांचा अतिरिक्त बोजा जी एस टी मुळे कमी झाला आहे कारण GST मध्ये जुने कराचे दर कमी करण्यात आले आहेत. त्यामुळे ग्राहकांची मोठया प्रमाणात बचत होऊन त्या बचतीचे रुपांतर भविष्यकाळात गुंतवणूकीत होऊ शकते.

## GST अंतर्गत कर आकारण्याची पध्दत

GST मध्ये वस्तू व सेवेच्या प्रत्येक पुरवठा व्यवहारावर कर आकारण्यात येतात. एक कर हा केंद्र सरकार व्दारे लावण्यात येईल. त्याला केंद्रीय वस्तू व सेवा कर (CGST) असे म्हटले जाते. आणि दुसरा कर हा राज्य सरकार व्दारे लावला जाईल त्याला राज्य वस्तू व सेवा कर ( SGST)असे म्हटले जाते तसेच परदेशातून होणा-या आंतरराज्य वस्तूव सेवांच्या पुरवठयावर तसेच आयातीवर केंद्र सरकार मार्फत एकात्मिक वस्तू व सेवा कर (Ohdy) लावण्यात येतो. किंवा संघराज्य असल्यास संघराज्य वस्तू व सेवा कर (UTGST) लावण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

AJANTA - ISSN - 2277-5730 - IMPACT FACTOR - 4.205 (www.sjifactor.com)

GST कर प्रणाली

| CGST | SGS | IGST |
|---|---|---|
| १.उत्पादन शुल्क | १ Vat | १ केंद्रीय विक्री कर |
| २ अतिरिक्त उत्पादनशुल्क | २ करमणूक व मनोरंजन कर | २ सीव्हीडी व एसएडी |
| ३ सेवा कर | ३ सेवा कर | |
| ४ अधिभार व उपकर | ४ जाहिरात कर | |
| | ५ लॉटरी, बेटींग व गॅम्बलीग कर | |
| | ६ जकात, LBT, व इतर प्रवेश कर | |
| | ७ अधिभार व उपकर | |

**GST आणि सामान्य माणूस**

पूर्वीच्या अप्रत्यक्ष कर प्रणालीत अनेक कर अस्तित्वात होते. त्यामुळे ग्राहकांना वस्तूच्या खरेदीसाठी जास्त किंमत मोजावी लागत होती. कर रचना सुटसुटीत करण्या-साठी सर्व कर एका छत्रा खाली आणने आवश्यक होते. या दृष्टीने GST आवश्यक वाटू लागली. सूपर्ण भारत देशात अप्रत्यक्ष कराची एकच पारदर्शक पध्दत हा वस्तू व सेवा कर प्रणालीचा गाभा आहे. उदयोजक आणि व्यापा-यांसाठी सोपी करपध्दत आहे या पध्दतीमुळे वस्तू व सेवांच्या किंमत घट होऊन ग्राहकास त्याचा फायदा होणार आहे. ग्राहकांना कसा फायदा होतो हे उदाहरणाव्दारे पाहू.

एका शर्ट उत्पादन मुल्य १०० रुपये आहे. हा शर्ट ग्राहकाच्या प्रत्यक्ष हातात पडे पर्यंत अनेक अप्रत्यक्ष कर त्या शर्ट मुळ किंमतीत अधिक होतात जसे सेवा कर १% व्हॅट १४.५% प्रवेश कर २% उत्पादन शुल्क १२.५% सी एस टी २% असे एकुण ३२% इतकी कराची आकारणी पूर्वी होत होती आणि शेवटी १००+३२=१३२ रु किंमतीला ही शर्ट ग्राहकाला खरेदी करावी लागत होती.

परंतु GST मध्ये कराचा एकुण भार कमी होतो कारण इतर सर्व करां ऐवजी एकच कर आकारला जाईल १०० रु मुळ किंमत असणा-या शर्ट वर २८% GSTआकरली जाईल त्यामुळे १३२ रुपयाचा शर्ट GST मध्ये १२८ रुपये किंमती ला ग्राहकाला मिळेल.

ग्राहकाला कोणल्या वस्तू कमी किंमतीला व कोणल्या जास्त किंमतीला मिळतील हे खालील तक्त्यावरुन समजते.

| • खाण्या पिण्याचे पदार्थ | पूर्वीचा कर % | GST% | फरक |
|---|---|---|---|
| **स्वस्त वस्तूः-** | | | |
| खादय तेल | ६ | ५ | -१ |
| साखर, मिठाई | १८.५ | ५ | -१३.५ |
| चहापत्ती | १८.५ | ५ | -१३.५ |
| काजू, मनुका | १२ | ५ | -७ |
| फरसाण | २६ | १२ | -१४ |
| मसाले, लवंग, दालचिनी | ०६ | ५ | -१ |
| लोणचे, मुरांबा, केचप, सॉस | १८.५ | १२ | -६.५ |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| • **महाग वस्तू** | | | |
| बिस्किट (१०० रु/ किलो पर्यंत) | १६ | १८ | +२ |
| चॉकलेट | १८.५ | २८ | +९.५ |
| खजूर | ० | १२ | +१२ |
| इन्स्टंट कॉफी / चहा | १८.५ | २८ | +९.५ |
| • **दुध व दुग्ध जन्य पदार्थ** | | | |
| • **स्वस्त पदार्थ** | | | |
| ब्रॅन्डेड पनीर, चक्का, दूध पावडर | ०६ | ५ | -१ |
| कंडेंस्ड मिल्क | १८.५ | १८ | -०.५ |
| आईस्क्रीम | २६ | १८ | -८ |
| • **महाग पदार्थ** | | | |
| दूध आणि चीज | ६ | १२ | +६ |
| लोणी, तूप, ताक | ६ | १२ | +६ |
| • ज्युस, पेये व मासळी स्वस्त | | | |
| मिनरल वॉटर | १२.५ | १८ | -५.५ |
| फळे भाज्याचे रस | १२ | १२ | ० |
| ज्यूस युक्त पेय | १२ | १२ | ० |
| दुध युक्त पेये | २६ | १२ | -१४ |
| फ्रोजन, सुकी, मासळी | ६ | ५ | -१ |
| • **महाग** | | | |
| शीत पेये | २३ | ४० | +१७ |
| प्रोटीन फुड | २६ | २८ | +२ |
| • **चार चाकी व दुचाकी स्वस्त** | | | |
| छोटी डिझेल कार | ३१ | ३१ | ० |
| छोटी पेट्रोल कार | ३० | २९ | -१ |
| मध्यम कार (डिझेल / पेट्रोल) | ४४ | ४३ | -१ |
| कार, बस, ट्रक, टायर | ३१.५ | २८ | -३.५ |
| • **महाग** | | | |
| हायब्रिड कार | ३०.५ | ४३ | +१२.५ |
| ट्रक | २७ | २८ | +१ |
| मोटार सायकल | २७ | २८ | +१ |



Scanned with OKEN Scanner

AJANTA - ISSN - 2277-5730 - IMPACT FACTOR - 4.205 (www.sjifactor.com)

| | | | |
|---|---|---|---|
| • **स्वायपाक गृहात उपयोगि साहित्य स्वस्त** | | | |
| प्लास्टिक सामान | २४.५ | १८ | -५.५ |
| चमचे, कटलरी | २४.५ | १२ | -०.५ |
| L P H शेगडी | १८.५ | १२ | -६.५ |
| स्टील आणि तांब्याची भांडी | १८.५ | १२ | -६.५ |
| स्वयंपाकाचा गॅस | १७ | ५ | -१२ |
| लाकडी वस्तू | २४.५ | १८ | -१२.५ |
| सेरेमिक, चीनी उत्पादने | २४.५ | १८ | -५.५ |
| स्टीलच्या वस्तु | १८.५ | १२ | -६.५ |
| ॲल्यूमिनियमची भांडी | १८.५ | १२ | -६.५ |
| • **गृहपयोगी वस्तू**<br>• **स्वस्त** | | | |
| कॉटन, ज्यूट हॅड बॅग | १९.२५ | १८ | -१.२५ |
| शिलाई मश्ीन (मोटर) | १२.५ | १२ | -०.५ |
| पत्रे, कॅरम, ल्यूडो, बुध्दीबळ | १८.५ | १२ | -७.२५ |
| • **महाग** | | | |
| टूथपेस्ट, टूथ ब्रश, दुध पावडर | २६ | २८ | +२ |
| छत्री, शिलाई मशीन (हाताने चालणारी ) | ६ | १२ | +६ |
| घडयाळे | २६ | २८ | +२ |
| • **घर बांधनी साहिल्य** | | | |
| • **महाग** | | | |
| स्टील पाईप | १७.५ | १८ | +०.५ |
| स्टील पत्रे, सळया, प्लास्टिक खिडक्या, दारे | १७.५ | १८ | +०.५ |
| प्लाय बोर्ड | १९.२५ | २८ | +८.७५ |
| टाईल्स | १९.२५ | २८ | +८.७५ |
| • **स्वस्त** | | | |
| सिमेंट | ३० | २८ | -२ |
| वाळू | ६ | ५ | -१ |
| • **शिक्षण :- वस्तू स्वस्त, सेवा महाग** | | | |
| • **स्वस्त.** मुलांसाठी कलर बुक | ० | ० | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| स्टेपलर, पेन्सिल, शॉपनर, स्कुल बॅग फाऊंटेन पेन, क्रेयॉन, रंग खडू, | १८.५ | १८ | -०.५ |
| • **महाग** . कोंचिगग क्लासेस शुल्क | १५ | १८ | +३ |
| • **इलेक्टॉनिक वस्त :-** | | | |
| • **स्वस्त** | | | |
| मोबाईल फोन | १८.५ | १८ | -०.५ |
| कॅलक्युलेटर | २६ | १२ | -१४ |
| कॅमेरा, स्पीकर, सेट ऑफ बॉक्स | २६ | २८ | -८ |
| • **महाग** | | | |
| T.V, फिज, वॉशिंग मशीन, मिक्स टी मेकर, हीटर, व्हिडीओ गेम | २७ | २८ | +१ |
| • **शेती अवजारे** | | | |
| • **स्वस्त** | | | |
| बियाणे, अनब्रँडेड जैविक खते | ६ | ० | -६ |
| हँड पंप व त्याचे सुटे भाग | १२.५५ | ५ | -७.५ |
| ट्रॅक्टर | १८.५ | १२ | -६.५ |
| ट्रॅक्टर टायर अउणि मि | १८.५ | १८ | -०.५ |
| • **महाग** | | | |
| इतर ट्रॅक्अर पाटर्स् | १८.५ | २८ | +९.५ |
| हार्वेस्टर, थ्रेशर, ग्रेडर, पाटर्स | ५ | १२ | +७ |
| रासायनिक खाते | ६ | १२ | +६ |
| कीटक नाश्क | ६ | १८ | +१२ |
| • **कपडा स्वस्त. रेडिमेड महाग** | | | |
| कॉटन आणि सिंथेटिक फॅब्रिक | १८.५ | ५ | -१३.५ |
| रेडिमेड १०००रु पर्यंत६ | ६ | ५ | -१ |
| रेडिमेड १०००रु पेक्षा जास्त | ६ | १२ | +६ |
| **दैनंदिन व्यवहारातील सेवा** | | | |
| फोन बील, विमा हप्ता, कुरियर एजन्सी फईइनेशियल सर्वि | १५ | १८ | +३ |
| एसी रेल्वे तिकीट | ४.५ | ५ | +०.५ |
| रेल्वे माल वाहतूक | ४.५ | ५ | +०.५ |
| एअर बिजनेस | ९ | १२ | +३ |
| Non Ac रेल्वे तिकीट | ० | ० | ० |

स्त्रोत:- Divyanarathi.com

Scanned with OKEN Scanner

वरील तक्तयावरुन असे स्पष्ट करण्यात आले आहे की ग्राहकांला वस्तू खरेदी करतांना खादय तेल, साखर, मिठाई, चहापत्ती, काजू, मनुका, फरसान, यावर पूर्वी पेक्ष कमी कर दयावा लागेल त्यामुळे खाण्या पिण्याच्या वस्तु स्वस्त होतील.गहू, आटा, मैदा, डाळ, बेसन, तांदुळ, चुरमुरे, सोजी, पापड, ताजी फळे भाज्या, यावर पूर्वीही कर नव्हता आणि GST मध्येपण कर नसणार आहे.

शिक्षण हे GST च्या कक्षेबाहेर आहे. परंतु हे शिक्षण शाळा व कॉलेज क्लासेसच्या शुल्कावर पूवी १५% सेवा कर होता तो आता १८% कर लागेल.

वस्तू संग्रहालय, राष्ट्रीय उदयाने, प्राणी संग्रहालयाच्या तिकिटांवर कर नाही मात्र, वॉटर पार्क जॉय राइड, थीम पार्क, यासारख्या ठिकाणी २८% कर लागेल कारण GST मध्ये याला लक्झरी मानले जाते.

कच्चे तेल, पेट्रोल, डिझेल, नैसर्गिक वायू आणि दारु सध्या GST च्या कक्षेबार आहेत. तर तंबाखूवर हे दर ७१.२०४% पर्यंत राहील अधिक २८% GSTकर वेगळा असेल.

**GST चा सामान्य माणसावरील परिणाम**

GST म्हणजे वस्तू व सेवा कर हा संपूर्ण देशभरात लागू केला जाणार आहे. पूर्वी देशात केंद्र आणि राज्यसरकार यांचे २० पेक्षा अधिक कर करदात्यांना भरावे लागत होते. परंतु हे सर्व कर रदद होऊन या सगळया करांची जागा GST ने घेतली आहे. GST च्या अमंलबजावणीमुळे सामान्य माणसावर पुढील परिणाम झाले आहेत.

१) व्यापार व उदयोगाच्या अनुपालनास सहज सोपी असलेल्या या करपध्दतीमध्ये करा वरील कर नसल्याने वस्तू व सेवांच्या किंमतीत घट होऊन ग्राहकांना त्याचा फायदा होईल.

२) देशात कोणत्याही ठिकाणी वस्तू खरेदी केली तरी वस्तूची किंमत तेवढीच राहते.

३) एक देश एक कर असल्यामुळे ग्राहकांना कर संरचनेची पूर्ण कल्पना येते. त्यामुळे विक्रेता अधिक किंमत आकारु शकणार नाही.

४) जीवन आवश्यक वस्तू खरेदी करतांना सर्वसामान्य माणसाचा विचार केला आहे. त्यामुळे ग्राहकांना जीवनआवश्यक वस्तूंवर GST लागणार नाही.

५) दैनंदीन खाण्या-पिण्याच्या वस्तूवर पूर्वी पेक्षा कमी कर दयावा लागत असल्यामुळे वस्तु कमी किंमतीला प्राप्त होतील.

६) पेट्रोल, डिझेल कार, मध्यम कार, सवसामान्य माणसाला खरेदी करता येईल.

७) सर्वसामान्य माणसाला दैनंदीन उपयुक्त पेट्रोल डिझेल हे GST कर प्रणालीच्या बाहेर आहेत त्यामुळे त्यावर जास्त किंमत दयावी लागेल.

८) सामान्य माणसाला लक्झरी सुविधांचा उपभोग घेणे शक्य नाही कारण त्यावर GST अधिक आहे.

९) सामान्य माणसाला रेल्वे प्रवास करताना एसी रेल्वेमध्यून प्रवास करण्यास अधिक पैसे मोजावे लागतील.

१०) देशातील सामान्या शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानचा वापर शेतात करु शकनार नाही. कारण शेती अवजारांवरती पूर्वी पेक्ष जास्त कर दर असल्यामुळे किंमत अधिक दयावी लागेल.

११) शेतीसाठीआवश्यक असणारे रासायनिक खते व किटकनाशके सामान्य शेतक-यांना जास्त किंमतीला खरेदी करावी लागतील.

थोडक्यात ज्या ज्या देशांनी GST लागू केला आहे त्यांचा इतिहास पाहता पारंभिक काळात महागाई थोडया प्रमाणात वाढते. मात्र काहीच वर्षात वस्तूचे दर स्थिर होतात. कारण दुहेरी कर लागत नाहीत.

थोडक्यात, GST मुळे व्यापारांची व्दि-कर भारातुन सुटका होणार आहे. दोन ठिकाणी कर (कूसकॅडिंग इफेक्ट) दयावा लागणार नाही. त्यामुळे एकुण उत्पादन खर्च कमी होईल आणि ग्राहकांना कमी किंमतीला वस्तू प्राप्त होतील. GSTच्या बाबती एक महत्वाची बाब म्हणजे वस्तू



Scanned with OKEN Scanner

किंवा सेवांवर वन पॉईट टॅक्स आकारला जाणार असल्यामुळे प्रत्येक खरेदी विक्री आता कागदावरच करावी लागेल. यामुळे व्यावहार पारदर्शक होतील. सर्वसामान्य माणूस फसला जाणार नाही. विकसीत देशाचा अनुभव पाहता भारतासारख्या देशामध्ये GST मुळे देशाच्या अर्थव्यवस्थे मध्ये मोठ्या प्रमाणावरती गुंतवणूक वाढून आर्थिक विकासा बरोबर आर्थिक वृध्दी साध्य करता येईल.

**संदर्भ**

१) दिपस्तंभ -- डॉ. किरण देसले.
२) भारतीय अर्थव्यवस्था -- रंजन कोळंबे
३) वस्तू आणि सेवा कर -- प्रा. मंगेश श्रिसाठ
प्रा. निवृत्ती नातवटे
४) लोकराज्य -- जुन २०१७ अंक
५) उदयोजक -- ऑगस्ट २०१७
६) www.cbec.gov.in -- Divyamarthi.com
७) www.nhavat.gov.in -- वस्तू व सेवा कर
वित्त विभाग महाराष्ट्र शासन

Scanned with OKEN Scanner